॥ कुठें शोधिसी रामेश्वर ॥

गायकः सुधीर फडके
गीतः मंगेश पाडगांवकर
संगीतः यशवंत देव

कुठें शोधिसी रामेश्वर अन् कुठें शोधिसी काशी
हृदयांतिल भगवन्त राहिला हृदयांतून उपाशी ॥ धृ. ॥

झाड फुलांनीं आलें बहरुन
तूं न पाहिलें डोळे उघडुन ।
वर्षाकाळीं पाउसधारा
तुला न दिसला त्यांत इषारा ।
काय तुला उपयोग आंधळ्या दीप असून उशाशीं ? ॥ १ ॥
रुद्राक्षांच्या गळ्यांत माळा
लाविलेंस अन् भस्म कपाळा ।
कधीं न घेउन नांगर हातीं
पिकविलेंस मातींतुन मोतीं ।
हाय अभाग्या भगवें नेसुन घर सन्यासुन जाशी ॥ २ ॥

देव बोलतो बाळमुखांतुन
देव डोलतो उंच पिकांतुन ।
कधीं होउनी देव भिकारी
अन्नासाठीं आर्त पुकारी ।
अवती भवती असुन दिसेना शोधितोस आकाशी ॥ ३